महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती /नागपूर/आस्था/परिपत्रक/3096/2025-26 दिनांक:- 27/10/2025

# -:परिपत्रक:-

महाज्योती या संस्थेमार्फत JEE/NEET/MHT-CET- Batch 2025-27 परीक्षा पुर्व ऑनलाईन प्रशिक्षणाकरीता विद्यार्थ्यांकडून दि.16/05/2025 रोजी पासून ते दि.15/09/2025 रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार सदर योजनेकरीता मंजुर विद्यार्थी संख्या व इयत्ता 10 वी ला प्राप्त झालेल्या गुणांकाचा आधारे प्राप्त अर्जाची तपासणी केले असता अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्तता करण्याकरीता दि.01/10/2025 ते दि.05/10/2025 रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांनी अर्जात असलेली त्रुटी पूर्तता केलेली आहे अशा विद्यार्थ्यांचा अर्जाची पुन:श्च तपासणी करुन संवर्गनिहाय व समांतर आरक्षण तसेच महाज्योती संस्थेच्या अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या एकुण- 3500 विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर यादीचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षण टक्केवारी | एकूण जागा | प्रवर्ग | प्रवर्गनिहाय उपलब्ध एकूण जागा | भरण्यात आलेल्या एकूण | Cut-off मार्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OBC | 59% | 2065 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 1444 | 1444 | 94.80 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 620 | 620 | 93.60 |
| 2 | SBC | 6% | 210 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 147 | 147 | 93.20 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 63 | 63 | 90.00 |
| 3 | VJ | 10% | 350 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 245 | 245 | 91.40 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 105 | 105 | 88.20 |
| 4 | NT-B | 8% | 280 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 196 | 196 | 92.00 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 84 | 84 | 89.80 |
| 5 | NT-C | 11% | 385 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 270 | 270 | 93.40 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 116 | 116 | 91.20 |
| 6 | NT-D | 6% | 210 | सर्वसाधारण प्रवर्ग 70% | 147 | 147 | 95.40 |
| | | | | महिला प्रवर्ग 30% | 63 | 63 | 94.00 |
| एकूण- | | | 3500 | - | 3500 | 3500 | |

- **दिव्यांग विद्यार्थी उपलब्ध नसल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येत आहे.**
- **निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाज्योती मार्फत टॅब वितरण करण्यात येईल, याबाबतची संपुर्ण माहिती विद्यार्थ्यांना वेळोवेळी महाज्योतीच्या कॉल सेंटरद्वारे देण्यात येईल.**
- **सदरची निवड यादी विद्यार्थ्यांना इयत्ता 10 वी ला प्राप्त झालेल्या गुणांकाच्या आधारे मेरीटनुसार लावण्यात आलेली आहे. तसेच cut-off मार्क्सनुसार विद्यार्थ्यांना समान गुण असल्यास जन्म दिनांकानुसार वयाने मोठ्या असणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमानुसार निवड केलेली आहे.**

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.